# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक
दिनांक १०/०८/२०१७

दिनांक ९/८/२०१७ रोजी मिळालेल्या गुप्त बातमिदाराच्या खबरेवरुन मा.अपर पोलीस अधिक्षक सो. यांच्या आदेशान्वये तसेच मा. प्रभारी अधिकारी स्थागुशा गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली मौजा देवखडकी ता. आरमोरी जिल्हा- गडचिरोली येथिल आरोपी नामे १) भजनराव येशू तुलावी, वय ४५ वर्ष, व्यवसाय-शेती, रा. देवखडकी ता. आरमोरी जि. गडचिरोली यांचे राहते घरी विदेशी दारु विक्री कामी साठवणूक करुन ठेवलेली आहे. अशा खात्रीशिर खबरेवरुन मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थागुशा गडचिरोली येथील दारुबंदी पथकाने मौजा देवखडकी, येथे सापळा रचून आरोपीचे राहते घराची अवैद्य दारु सदंर्भात झडती घेतली असता त्यांचे राहते घरातील स्टोअररुम मध्ये ६,३२,४००/- रु. चा माल अवैधरित्या विक्री करीता साठवणुक करुन ठेवला होता. सदरचा विदेशी दारुचा माल आरोपी २) महेश विश्वनाथ चौधरी, वय ३१ वर्ष, रा. चिंगली ता. धानोरा जि. गडचिरोली याच्या मालकीचा असुन नामे ३) निर्मल धमगाये, रा. कोरची ता. कोरची जि. गडचिरोली यांनी आपल्या मालकीच्या चारचाकी वाहनाने वाहतुक करुन आरोपी क्र. १ च्या घरी साठवणूक करुन ठेवला होता.

नमूद तिन्ही आरोपी विरुदध पोस्टे पुराडा येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (अ), (ई), ८३ (अ), ८६(१) अन्वये गुन्हा नोंद केला असून सदर गुन्हयाचा पूढील तपास पोस्टे पुराडा येथे चालू आहे .

सदरची कारवाई, सहाफौ/७८७ करकाडे, पोहवा/८४५ प्रमोद वाळके, पोना/३०९२ दुधराम चवारे, मपोशि/४१५२ दुर्गा साखरे, चापोशि/५२९२ प्रदिप चवरे यांनी केली आहे.